Shri Aillak Pannalal Digamber Jain Pathashala's

**WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY**

Seth Walchand Hirachand Marg, Ashok Chowk, Post Box No.634, SOLAPUR – 413006.

Accredited by **NBA,** New Delhi and NAAC A+ Grade
Winner of AICTE-II Survey 2013 , 2014 & 2018 Award for Best Industry – Liked Institute.
Recognized by **AICTE**, New Delhi and permanently affiliated to **Solapur University, Solapur**

● ☎ : 2651388, 2652700 ● Fax : (0217) 2651538 ● Email: principal@witsolapur.org ● Website : www.witsolapur.org

Date : 25-03-2020

# Circular

This has reference to the guidelines issued by Ministry of Home Affairs Order No. 40-3/202-D dated 24.03.2020, to restrict spread of Corona Virus (COVID-19) and University circular dated 23-03-2020.

In order to restrict the spread of corona virus (COVID-19), in accordance with above referred communications, all the activities at Walchand Institute of Technology, Solapur are totally suspended. Therefore the institution will be totally closed till 14th April, 2020.

All faculties & Staff members shall stay at headquarter & home while maintaining social distance to restrict the spread of corona virus (COVID-19).

Please note, if required, in case of any work/emergency you shall report immediately on instruction.



Dr. S.A.Halkude
Principal

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



## आस्थापना विभाग

वाचा:- १) मा. सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, यांचेकडील पत्र दि.२१/०३/२०२०.
२) मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. F.No.१-१४/२०२०, दि.२१/०३/२०२०.
३) मा. शिक्षण संचालक, उ. शि., पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/कोरोना/मावि-१/२०२०/३८१९/४०४२, दि.१९/०३/२०२०.
४) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/आस्था/परिपत्रक/२०२०/३७३१, दि.२३/०३/२०२०.
५) ग्रह विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. ४०-३/२०२०-DM-I (A), दि. २४/०३/२०२०.
६) महसून, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. DMU/ २०२०/ CR.९२/DisM-१, दि. २५/०३/२०२०.

## प रि प त्र क

कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) अटकाव व्हावा म्हणून मा. सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व मा. शिक्षण संचालक, उ. शि., पुणे यांचेकडून संदर्भ क्र. १ ते ३ च्या पत्रान्वये प्राप्त निर्देशास अनुसरुन संदर्भ क्र. ४ च्या परिपत्रकान्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या अधिनस्त सर्व प्रशासकीय विभाग, शैक्षणिक संकुले, संलग्नित सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये सोमवार दि. २३ मार्च, २०२० ते मंगळवार दि.३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

याबाबत, संदर्भ क्र. ५ अन्वये ग्रह विभाग, भारत सरकार यांचेकडून नव्याने प्राप्त निर्देशासन अनुसरुन संदर्भ क्र. ६ अन्वये महाराष्ट्र शासनाकडून नव्याने प्राप्त आदेश तथा सुचनेनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या अधिनस्त सर्व प्रशासकीय विभाग, शैक्षणिक संकुले, संलग्नित सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये ईत्यादी आस्थापनेवर काम करणारे सर्व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) चा संसर्ग होऊ नये व त्याचा प्रादुर्भाव /प्रसार वाढू नये याकरीता प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून विद्यापीठ प्रशासन, विद्यापीठातील सर्व संकुले तसेच संलग्नित सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये मंगळवार, दि.१४/०४/२०२० पर्यंत बंद राहतील. सदर कालावधीत सर्व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांनी घरी बसूनच आवश्यक ती शैक्षणिक/प्रशासकीय कामे करावीत.

तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता महाविद्यालय/विद्यापीठ कार्यालयास एखाद्या शिक्षक/अधिकारी/कर्मचाऱ्याची गरज भासल्यास प्राचार्य/विभागप्रमुखांच्या आदेशानुसार संबंधित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयामध्ये उपस्थित राहणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन,

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/परिपत्रक/२०२०/३७३४
दिनांक : 26 MAR 2020

१) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
५) विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) संचालक/प्राचार्य, सर्व संलग्नित संस्था/महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

सदर परिपत्रक आपल्या संकुलातील / विभागातील/ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.